RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५८ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.१८ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## एनआयएची अमरावती आणि पुण्यात छापेमारी
## तरुण एनआयएच्या ताब्यात, दहशतवादी कारवायांमध्ये गुंतल्याचा संशय

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राष्ट्रीय एजन्सी एनआयएने आज महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात केलेल्या छापेमारी व कारवाईनंतर इसिस मॉड्युल हे पुन्हा एकदा राष्ट्रीय तपास यंत्रणाच्या रडारवर आलेला आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूरमध्ये एनआयएने छापा टाकला आहे. एका विद्यार्थ्याची एनआयए पथकाकडून चौकशी सुरू आहे. विद्यार्थी दहशतवादी कारवायांमध्ये गुंतल्याचा संशय आहे. त्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अमरावतीबरोबर पुणे-गुलटेकडी येथे राहणाऱ्या तरुणाची एनआयएकडून चौकशी ने केली आहे. तर दुसरीकडे




अमरावती जिल्ह्याच्या अचलपूरमध्ये एनआयएने छापेमारी केली आहे.अमरावती जिल्ह्यातील अचलपूरमध्ये एनआयएच्या पथकाकडून छापेमारी करून एका १९ वर्षीय युवकाला घेतलं ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेल्या १९ वर्षीय युवकाची अमरावती येथील जोग क्रीडा संकुल मधील मंथन हॉल याठिकाणी चौकशी सुरू आहे. छख- टीम नी ताब्यात घेतलेल्या तरुणाच्या घरून काही कागदपत्रे आणि लपटॉप आणल्याची माहिती समोर आली आहे. अचलपूरच्या अकबरी चौक मधील बियाबानी गल्लीतून तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे.

### व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून जिहादी संघटनांच्या संपर्कात

राष्ट्रीय एजन्सी एनआयएने ताब्यात घेतलेला तरुण हा अचलपूर येथील महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थी सोशल मीडिया, विशेषत: व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून जिहादी संघटनांच्या संपर्कात होता. हा विद्यार्थी दहशतवादी कारवायांमध्ये सामील असल्याच्या संशयावरून एनआयएचा पथक स्थानिक एटीएस आणि जिल्हा पोलिसांच्या पथकासह आज पहाटे ४ वाजता अचलपूरला पोहोचले होते. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अमरावतीला आणले सध्या त्याची कसून चौकशी सुरू आहे.

### कर्नाटकातही छापे

एनआयएने एकट्या कर्नाटकात १९ ठिकाणी छापे टाकले आहेत. यापूर्वी १३ डिसेंबर रोजी एनआयएने दहशतवादी कट प्रकरणी बंगळुरुमध्ये ६ जणांना ताब्यात घेतले होते. यानंतरही शोधमोहीम सुरुच आहे. यापूर्वी एनआयएच्या पथकाने पुणे, मीरा रोड, ठाणे आणि कर्नाटकातील बंगळुरुसह अन्य ४४ ठिकाणी छापे टाकून संशयितांना ताब्यात घेतले आहे.

### गुलटेकडी येथे राहणाऱ्या तरुणाची एनआयएकडून चौकशी

पुण्यातील गुलटेकडी परिसरात राहणाऱ्या तरुणाकडे ने चौकशी केलीय. त्याचबरोबर एन.आय.ए.च्या गुन्ह्यात आधीपासून आरोपी असलेल्यांच्या घरी जाऊन देखील चौकश करण्यात आली आहे. च्या बंगळूरमधील पथकाने ही कारवाई केलीय. पुण्यातील अरिहंत कॉलेजचा विद्यार्थी असलेल्या १९ वर्षीय साफवान शेखची एनआयएकडून चौकशी करण्यात आली आहे. साफवानकडून मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस जप्त करण्यात आलेत. साफवान हा बेंगलोरस्थित इसिस मॉड्यूलच्या टेलिग्राम गृपमध्ये सहभागी असल्याने चौकशी करण्यात आली आहे. छख- ने अलिकडच्या काही महिन्यांत मोठ्या प्रमाणावर छापे टाकले आहेत आणि खडखड च्या दहशतवादी कट प्रकरणात अनेक दहशतवादी कार्यकर्त्यांना अटक करून वेगवेगळ्या खडखड मॉड्यूल्सचा पर्दाफाश केला आहे.

## अजित पवार भाजपच्या रेशीम बाग येथील कार्यक्रमाला जाणार नाहीत

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या (मंगळवार) नागपुरातील रेशीम बाग येथे जाणार नाहीत. भाजपच्या वतीने महायुतीतील घटक पक्ष



असणाऱ्या शिवसेना व राष्ट्रवादी या पक्षांच्या आमदारांना रेशीमबागेत डॉक्टर हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांना अभिवादन करण्याकरता उपस्थित राहण्याचं निमंत्रण देण्यात आले होते. अजित पवार येथे जाणार नसल्याची माहिती खात्रीलायक सुत्रांनी दिली आहे.

भाजपचे मुख्यप्रतोद आशिष शेलार यांच्या वतीने आमदारांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले होते. अजित पवार रेशीम बाग येथे जाणार नाही. मंगळवारी सकाळी भाजपचे सर्व आमदार डॉक्टर हेडगेवार व गोळवलकर गुरुजी यांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. यामधून अजित पवार यांनी काढता पाय घेतलाय. अजित पवारांसोबत असणारे इतर आमदार जाणार का? याबाबत मात्र अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

राजकीय वर्तुळात अजित पवार कार्यक्रमाला उपस्थित राहणार का? याकडे सर्वांचे लक्ष होतं. परंतु पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे अजित पवार जाणार नसल्याची विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिली आहे.

## सलीम कुत्ता जिवंत की मृत, काँग्रेस आमदारांच्या दाव्याने खळबळ

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा साथीदार सलीम कुत्ता जिवंत आहे की मेलाय याचीच चर्चा सध्या नागपूर येथे होत असलेल्या हिवाळी अधिवेशनात होत आहे. भाजप आमदार नितेश राणेंनी अंडरवर्ल्डच्या लोकांसोबत शिवसेना ठाकरे गटाचा पदाधिकारी नाचत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आज (सोमवार) काँग्रेस आमदारांनी सलीम कुत्ता मेला असल्याचा दावा केला आहे, यामुळे खळबळ उडाली आहे. सलीम कुत्ता जिवंत आहे की मेलाय, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नाशिक महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांचा नाचतानाचा एक व्हिडीओ भाजप आमदार नितेश राणे यांनी समोर आणला होता. त्यानंर बडगुजर यांची नाशिक पोलिसांकडून चौकशीही सुरु झाली. नाशिकचे माजी नगरसेवक सुधाकर बडगुजर यांचे अंडरवर्ल्डची काय संबंध आहेत, या दिशेने पोलिस



तपास करत आहेत.

दरम्यान, काँग्रेसचे जालना येथील आमदार कैलास गोरंट्याल यांनी विधिमंडळ अधिवेशनापूर्वी विधानभवन परिसरात सलीम कुत्ता उर्फ सलीम कुर्ला याची १९९८ मध्ये हत्या झाल्याचा खळबळजनक दावा केला.

कैलास गोरंट्याल म्हणाले, माझ्या माहितीनुसार, १९९३ मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्ता याची मुंबईतील रुग्णालयात हत्या १९९८ साली झाली झाली होती. छोटा राजनचे गूर्गे रोहित वर्मा, भानू ढाकरे आणि संतोष शेट्टी यांनी त्याला मारले. नितेश राणे यांनी नवीन सलीम कुत्ता कुठून आणला, असाही सवाल गोरंट्याल यांनी केला.

सलीम कुत्ता मेला आहे की नाही, याचे उत्तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच दिले पाहिजे, अशीही मागणी काँग्रेस आमदारांनी केली आहे.गोरंट्याल म्हणाले, सलीम कुत्ता याची हत्या झाली आहे. त्याच्या तीन बायका आहेत. सलीम कुत्ताची हत्या झाल्यानंतर त्याच्या पत्नींनी आमचा पती वारला आहे, तर आता जप्त केलेली आमची मालमत्ता आम्हाला परत करण्याची कोर्टात मागणी केली होती. टाडा न्यायालयाकडून ही प्रॉपर्टी रिलीज करण्यात आल्याचाही दावा कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. या सगळ्या संदर्भात राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निवेदन केले पाहिजे, अशी मागणी काँग्रेस आमदार कैलास गोरंट्याल यांनी केली. यावेळी त्यांच्यासोबत विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.

## संसद सुरक्षेवरुन गदारोळ; अधीर रंजन चौधरी यांच्यासह ३३ विरोधी खासदार निलंबित



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेच्या सुरक्षेतील त्रुटीबाबत सोमवारी सुद्धा विरोधी पक्ष आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. यावरून लोकसभा आणि राज्यसभेत प्रचंड गदारोळ झाला. दरम्यान, लोकसभा अध्यक्षांनी काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांच्यासह अनेक विरोधी खासदारांना संपूर्ण हिवाळी अधिवेशनासाठी लोकसभेतून निलंबित केले.

काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी यांच्यासोबत अपूर्वा पोद्दार, प्रसून बॅनर्जी, मोहम्मद वसीर, जी सेल्वम, सीएन अन्नादुराई, डॉ टी सुमती, के नवासकानी, के वीरस्वामी, एनके प्रेमचंद्रन, सौगत रॉय, शताब्दी रॉय, असिथ कुमार मल, कौशलेंद्र कुमार, अँटोनी कुमार, एस एस पलनामनिक्कम, तिरुवरुस्कर, प्रतिमा मंडल, काकोली घोष, के मुरलीधरन, सुनील कुमार मंडल, एस रामा लिंगम, के सुरेश, अमर सिंह, राजमोहन उन्नीथन, गौरव गोगोई आणि टीआर बालू यांना निलंबित करण्यात आले.सभागृहातील गदारोळामुळे वरील ३० खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. तर विशेषाधिकार समितीचा अहवाल येईपर्यंत के जयकुमार, विजय वसंत आणि अब्दुल खालिक यांना निलंबित करण्यात आले. दरम्यान, विरोधी पक्ष केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेच्या सुरक्षेच्या उल्लंघनाबाबत दोन्ही सभागृहांमध्ये निवेदन देण्याची मागणी सातत्याने करत आहेत.

## छगन भुजबळ आणि मनोज जरांगेंमध्ये पुन्हा जुंपली; एकमेकांवर वैयक्तिक हल्लाबोल

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मराठा आरक्षणासाठी एकीकडे मनोज जरांगे पाटील आग्रही मागणी करतायेत तर दुसरीकडे मराठ्यांना वेगळे आरक्षण द्या ओबीसीमधून नको अशी भूमिका मंत्री छगन भुजबळ मांडत आहे. त्यात मागील २ महिन्यापासून राज्यात भुजबळ-जरांगे यांचे शाब्दिक युद्ध पाहायला मिळत आहे. त्यात आता दोघांनी एकमेकांवर वैयक्तिक हल्लाबोल केला आहे. बेवड्या, पिऊन पिऊन किडन्या किडल्या अशी बोचरी टीका भुजबळांनी जरांगेंवर केली तर भुजबळ हे मुर्खाचा मुकादम आहे असा पलटवार जरांगेंनी भुजबळांवर केला.



भिवंडी येथील ओबीसी मेळाव्यात छगन भुजबळ म्हणाले की, जरांगे आमची लायकी काढतात. काहीही बोलतो, मला येवल्याचा येडपाट म्हटलं. एक म्हण आहे 'आधीच मर्कट तशातच मद्य प्याला' आधीच माकड त्यात बेवडा प्यायला, काहीही बोलतो. अरे आमची लायकी तू काय काढतोस, काय तुझी हिंमत, काय बघणार आहे मला? तू तुझी तब्येत सांभाळ. बेवडा पिऊन पिऊन तुझ्या किडन्या किडल्या त्या सांभाळ. मला मारण्याच्या धमक्या, उघडपणे दादागिरी करतोय. हे अजिबात सहन केले जाणार नाही असं त्यांनी म्हटलं.

त्यावर हा आधीच जातीवादी आणि तो मुर्खाचा मुकादमच आहे. महामुर्ख माणूस असल्याने त्याला येडपाट म्हणतो. माझ्या शरीराला जन्मल्यापासून दारूचा डाग नाही. हे शरीर जनतेसाठी लढून असं झालंय. तुझ्यासारखं लोकांचे रक्त पिऊन शरीर वाढले नाही.माकड काय करू शकतो हे रावणाला विचार, तुझीही लंका जळेल, नीट राहा असा पलटवार मनोज जरांगे पाटील यांनी भुजबळांवर केला आहे.

## महाजनांच्या मदतीला फडणवीस धावले
## विरोधकांना खडे बोल सुनावत माफी मागायला सांगितले

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

उद्धव ठाकरे सभागृहात आले त्यामुळे कदाचित गिरीश महाजन आणि सलीम कुत्ता हा विषय पुढे आणला. आरोपाची खातरजमा न करता मंत्र्यांवर आरोप केले गेले. गिरीश महाजन यांच्यावर बेछुट आरोप केल्याबद्दल विरोधकांनी माफी मागितली पाहिजे. विरोधकांनी लावलेले आरोप पूर्णपणे खोटे आहेत असं स्पष्टीकरण राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिले.

सोमवारी विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर विधान परिषदेत राष्ट्रवादीचे आमदार एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांच्यावर दाऊदशी संबंध असल्याचा आरोप केला. त्याचसोबत सलीम कुत्तासोबत महाजन उपस्थित असल्याचा फोटो दाखवला. त्यावरून सभागृहात विरोधकांनी गोंधळ घातला. ठाकरे गटाचे अनिल परब आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांचा राजीनामा मागितला. या संपूर्ण प्रकरणावर देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात खुलासा करत विरोधकांवर पलटवार केला.

## उबाठाचा नवा नेता, सलीम कुत्ता...; शिंदे गटाचे विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मुंबईत १९९३मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाचा सुत्रधार दाउद अब्राहिमचा राइट हॅण्ड असलेला सलीम कुत्ता याला टाडा न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तो नाशिक जेलमध्ये शिक्षा भोगतोय. अशा परिस्थितीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेता सुधाकर बडगुजर फार्म हाउसवर सलीम कुत्ताच्या नावाने पार्टी करतोय, या देशद्रोह्यांची मागणी शिंदे गटाच्या आमदारांनी सोमवारी विधानभवनाच्या पायऱ्यांवर




केली. उबाठाचा नवा नेता, सलीम कुत्ता... सलीम कुत्ता... अशी नारेबाजी करत आमदारांनी परिसर दणाणून सोडला.

सुधाकर बडगुजरचा मुंबईतला गॉडफादर कोण हे नाशिकचा प्रत्येक माणूस जाणतो, असा थेट आरोप करत मंत्री दादा भुसे यांनी केला. या देशद्रोह्यांना अद्दल घडवलीच पाहिजे. बडगुजर हा सलीम कुत्ताला फायनान्स करतो. हे देशद्रोह्यांचे उदात्तीकरण आहे, असेदेखील भुसे म्हणाले. दरम्यान आमदार कैलास गोरंट्याल यांनी सलीम कुत्ता याची हत्या १९९८मध्ये झाल्याचा दावा केला आहे. यावर बोलताना भुसे म्हणाले,'सलीम कुत्ता मेला असेल तर त्याच्या नावाने नाशिक जेलमध्ये शिक्षा कोण भोगतोय, याचीदेखील चौकशी झालीच पाहिजे.' या मुद्द्यावरून गृहमंत्र्यांची भेट घेण्या असल्याचे दादा भुसे म्हणाले. यावेळी आंदोलनात भरत गोगवले, संतोष बांगर, दिलीप लांडे, श्रीनिवास वंगा, मंजुळा गावित, यामिनी जाधव, गीता जैन आदींची उपस्थिती होती.

## सरकार ड्रग्स माफियांच्या पाठीशी, विरोधकांचा आरोप, विधानभवन परिसरात आंदोलन

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्य सरकार ड्रग्स माफियानां पाठीशी घालत आहे. सरकारमधील काही मंत्री यामध्ये सहभागी आहेत, असा आरोप विरोधकांनी सोमवारी लावला. या मुद्द्यावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधानभवन परिसरात आंदोलन केले.

'उडता पंजाबनंतर उडता महाराष्ट्र', 'सरकारकडून काय करावी आशा, तरुणांच्या माथी मारली ड्रग्सची नशा', असे फलक हातात घेऊन महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारला धारेवर धरले. यावेळी 'ड्रग्स माफियांना पाठीशी घालणाऱ्या सरकारचा निषेध असो', 'उडता महाराष्ट्र करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो', अशा घोषणा देण्यात आल्या.




याबाबत अधिक सांगताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले,'शेजारी असलेल्या गुजरातमधून दोन हेलिकॉप्टर येतात. त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात ड्रग्स माफिया कार्यरत आहेत. त्यांना सरकार पाठीशी घालत आहे. महाराष्ट्र तसेच उत्तर प्रदेश सरकारमधील काही मंत्री या माफियांना संरक्षण देताहेत. ललित पाटील या संपूर्ण प्रकरणातील छोटासा प्यादा आहे. वास्तविक पाहता हे सरकार यासाठी जबाबदार असून त्यांच्याद्वारे ड्रग्स माफिया सक्रिय आहेत.' यावेळी आंदोलनात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह वर्षा गायकवाड पाटील, रवींद्र धंगेकर, सतेज पाटील आदींची उपस्थिती होती.

## संपादकीय ......

# समृद्धीचे सुदृढ मापदंड

समृद्धी केवळ आर्थिक मापदंडातूनच मोजली जाऊ शकते का? काहींच्या दृष्टीने असे असूही शकेल; मात्र सुदृढ आणि निरोगी शरीरही समृद्धीचे महत्त्वाचे लक्षण आहे, हे सांगण्यासाठी आज बहुतांश जणांना पटलेले दिसते. खेळांमध्ये युवा पिढीचा अधिकाधिक सहभाग या समृद्धीचे द्योतक, असे म्हणता येईल. ही समृद्धी आज क्रीडा क्षेत्रात देशाचे नावही गौरवाने घेतले जाण्यास पोषक आहे. म्हणजे काय तर आज खेळाच्या पटलेल्या महत्त्वाची अनुभूती देशातील क्रीडा क्षेत्रात झालेल्या आमूलाग्र बदलातून येत आहे. देश खरंच बदलतो आहे का, असा प्रश्न कुणी केल्यास नक्कीच अशी बरीच क्षेत्रे उदाहरणादाखल समोर मांडता येईल. नेतृत्व करणार्या व्यक्तीच्या कल्पनाशक्तीची जेवढी कसोटी लागणार, तेवढे सकारात्मक निर्णय बाहेर येऊन त्यातून परिवर्तन दिसून येते, हे सध्या देश अनुभवतो आहे. अनेक क्षेत्रांमध्ये देशाने पाहिलेले परिवर्तन सर्वश्रुत आहे. मग क्रीडा क्षेत्र यातून कसे बरे मागे राहणार! 'खेलो इंडिया मिशन'च्या माध्यमातून भारत सरकारने क्रीडा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणत युवक-युवतींचा खेळात सहभाग वाढविण्याचा घेतलेला ध्यास आता पूर्णत्वास गेल्याचे दिसत आहे. जिल्ह्याजिल्ह्यांत सुरू करण्यात आलेले खेलो इंडियाचे प्रशिक्षण केंद्र आज ग्रामीण भागातील उदयोन्मुख प्रतिभावंत खेळाडूंना स्वतःला सिद्ध करण्याची संधी देत आहेत. काही दिवसांपूर्वी झालेल्या आशियाड स्पर्धेत भारताने केलेले पदकांचे शतक याच सकारात्मक धोरणाची फलश्रुती म्हणावी लागेल. हा एक इतिहास आहे. नागपूरचा ओजस देवतळे याच खेलो इंडियाची देणगी म्हणावी लागेल.

पुन्हा एकदा हे गाठोडे उघडले गेले असल्याने खेळाडू आणि खेळ अशा दोघांनाही नक्कीच उभारी मिळेल. आज मैदानी खेळ पुस्तकात वाचून सांगण्यापुरते किंवा संगणकावर माऊस आणि की-बोर्डच्या मदतीने खेळण्याइतपतच शिल्लक राहिले. मैदानात जाऊन कबड्डी, खो खो किंवा लंगडी खेळणारा कदाचितच आज सापडेल. कारण शिकविणार्यांनाही याचे फारसे सोयरसुतक राहिले नाही आणि शिकणार्यांचा तर प्रश्नच येत नाही. परिणामी जुने जाऊन नवे धरले गेले; पण नव्याच्या मागे पळताना जुन्या खेळातून जी शारीरिक समृद्धी आणि निरोगी आरोग्याची हमखास खात्री मिळत होती, ती राहिली नाही. काही खेळ नक्कीच आर्थिक समृद्धी देत आनंदही देत असतील, पण सुदृढ आरोग्याची संपत्ती मात्र त्यातून मिळेलच, याची खात्री कोण देणार? आज खेलो इंडियाने परिवर्तनाची सुरुवात झाली. गावापर्यंत याचे लोण पसरले आहे. अशातच भंडारा जिल्हा परिषदेच्या स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाच्या सुरू होणार्या उपक्रमाची उभारी त्याला मिळाल्यास ग्रामीण भागातील 'हिर्यां'ची झळाळी नक्कीच शहराच्या मैदानावर दिसून येईल.

पुन्हा एकदा हे गाठोडे उघडले गेले असल्याने खेळाडू आणि खेळ अशा दोघांनाही नक्कीच उभारी मिळेल. आज मैदानी खेळ पुस्तकात वाचून सांगण्यापुरते किंवा संगणकावर माऊस आणि की-बोर्डच्या मदतीने खेळण्याइतपतच शिल्लक राहिले. मैदानात जाऊन कबड्डी, खो खो किंवा लंगडी खेळणारा कदाचितच आज सापडेल. कारण शिकविणार्यांनाही याचे फारसे सोयरसुतक राहिले नाही आणि शिकणार्यांचा तर प्रश्नच येत नाही. परिणामी जुने जाऊन नवे धरले गेले; पण नव्याच्या मागे पळताना जुन्या खेळातून जी शारीरिक समृद्धी आणि निरोगी आरोग्याची हमखास खात्री मिळत होती, ती राहिली नाही. काही खेळ नक्कीच आर्थिक समृद्धी देत आनंदही देत असतील, पण सुदृढ आरोग्याची संपत्ती मात्र त्यातून मिळेलच, याची खात्री कोण देणार? आज खेलो इंडियाने परिवर्तनाची सुरुवात झाली. गावापर्यंत याचे लोण पसरले आहे. अशातच भंडारा जिल्हा परिषदेच्या स्वदेशी खेळोत्तेजक मंडळाच्या सुरू होणार्या उपक्रमाची उभारी त्याला मिळाल्यास ग्रामीण भागातील 'हिर्यां'ची झळाळी नक्कीच शहराच्या मैदानावर दिसून येईल.

# शिवमहापुराण कथेबाहेरून दुचाकी, मंगळसूत्र लंपास राजापेठ, फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात नोंद




**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असताना शिवमहापुराण कथेला चोरांनी देखील सलामी लावली. एकाने मंगळसूत्रावर डल्ला मारला, तर एकाने पार्किंगस्थळावरची दुचाकी लांबविली. १५ व १६ डिसेंबर रोजी सायंकाळी या दोन्ही घटना घडल्या, मंगळसूत्र चोरीबाबत राजापेठ तर दुचाकी चोरीबाबत फ्रेजरपुरा पोलिसांनी तक्रारीची नोंद करवून घेत अज्ञातांविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविला.छत्री तलाव रोड, भानखेडा मार्गावरील हनुमानगढी येथे १६ डिसेंबरपासून महाशिवपुराण कथेला सुरूवात झाली आहे. त्यात लाखो महिला सहभागी झाल्या आहेत. तर दुसरीकडे पोलिसांचा देखील कडेकोट बंदोबस्त आहे. तेथे देखील चोर, भामटे, भुरटे सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. येथील एक महिला तिच्या परिवारासह त्या शिवमहापुराण कथा श्रवणासाठी गेल्या होत्या, १६ डिसेंबर रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास कार्यक्रम संपल्यानंतर त्या सभामंडप बाहेर येण्यासाठी निघाल्या, तोपर्यंत त्यांच्या गळ्यात ३५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र होते. मात्र गेटजवळ आल्या असता त्यांना मंगळसूत्र दिसले नाही. त्यांनी त्या गर्दीत मंगळसूत्र शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र ते आढळले नाही. चोराने सभामंडप ते गेटदरम्यान मंगळसूत्र चोरल्याची तक्रार त्या महिलेने राजापेठ ठाण्यात नोंदविली.

### हनुमानगढीहून यावे लागले पायदळ

तत्पूर्वी, २५ डिसेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुल ते भानखेडा रोडवरील हनुमानगढीपर्यंत भव्य कलश यात्रा काढण्यात आली. ती पाहण्याकरिता नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील चोर माहुली येथील अरुण उपारीकर (५५) हे दुचाकीने हनुमानगढीवर गेले होते. तत्पूर्वी, २५ डिसेंबर रोजी रात्री त्यानी आपली दुचाकी कंवरधामच्या बाजूला असलेल्या पार्किंग स्थळी लावली. रात्री ८.३० च्या सुमारास ते कलस यात्रेचे दर्शन घेऊन परतले असता त्यांनी त्यांची दुचाकी आढळून आली नाही. शोधाशोध केल्यानंतरही ती न मिळाल्याने त्यांना अखेर पायदळच अमरावती गाठावे लागले. फ्रेजरपुरा पोलिसांनी शनिवारी दुपारी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदविला.

# कापूस वेचायला बाया मिळेना अन शिवपुराण मंडपात बाया मावेना

## विदर्भाची दयनीय परिस्थितीला जबाबदार कोण ?

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर-** पावसाने दमदार हजेरी दिल्याने शेतामधील कापूस हा ओला झाल्याने शेतकरी चिंतेत असताना,नवीन आता शेतात निघाल्याने कापूस सर्व शेतीचा परिसर पांढऱ्या सोन्याने पांढरा झाला आहे.




सर्वत्र कापूसच कापूस दिसून येत आहे,मात्र कापूस वेचायला बाया मजूर मिळत नाहीत.मिळाल्या तर बारा रुपये,दहा रुपये असा भाव मागतात,त्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर परेशान झालेला आहे.कापूस वेचायला बाया नसल्याने एकीकडे शेतकरी चिंतेत आहे तर दुसरीकडे शिवपुराण मंडपात बाया हजारोच्या संख्येने उपस्थित आहेत.अशी दयनीय परिस्थिती सद्यस्थितीत विदर्भाची झाली आहे.

विदर्भ म्हणजेच वऱ्हाड आणि सोन्याची कराड, एकेकाळी म्हतल्या जात होते,मात्र सध्या ती म्हण कोसो दूर गेली आहे.

फक्त राजकारणामुळे ज्याचं त्याचं राजकारण करून स्वतःचं पोट भरण्याचा कार्यक्रम हा सुरू आहे. मग पक्ष कुठलाही असो प्रत्येकाच्या तोंडात शेतकरी फक्त निवडणूक पुरता असतो, शेतकऱ्यांच्या नावावर दुकानदारी करणारे कितीतरी आहेत.मात्र शेतकऱ्याला अडचणीतून काढण्याचा प्रयत्न न करता फक्त आंदोलने प्रसिद्धी करिता केल्या जातो.अशी आजची शेतकऱ्यांची परिस्थिती बनली आहे.

# ज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे आधुनिक सत्पुरुष!

संत गाडगे महाराज पुण्यतिथि निमित्त विनम्र अभिवादन! डेबुजी झिंगराजी जानोरकर ज्यांना सामान्यतः संत गाडगे महाराज आणि गाडगे बाबा म्हणून ओळखले जाते. गाडगे बाबा हे एक समाजसुधारक आणि भटके सेवक होते. जे महाराष्ट्रात सामाजिक विकासासाठी साप्ताहिक उत्सव आयोजित करत असत. त्यांनी त्यावेळी भारतीय ग्रामीण भागात बरीच सुधारणा केली आणि आजही अनेक राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्था त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आहेत. २० डिसेंबर रोजी त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.संत गाडगे महाराजांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेडगाव गावात एका धोबी कुटुंबात झाला. ते एक भटके सामाजिक शिक्षक होते, पायात फाटलेल्या चप्पल घेऊन ते पायी प्रवास करायचे. ते गावात शिरला की, लगेच गटारी आणि रस्ते साफ करायला सुरुवात करायचे. काम आटोपल्यावर गावाच्या स्वच्छतेसाठी ते स्वतः लोकांचे अभिनंदन करायचे. लोकांकडून जमा झालेल्या पैशातून महाराज गावोगावी शाळा, धर्मशाळा, रुग्णालये, प्राण्यांचे निवारे बांधत असत.गावांची स्वच्छता केल्यानंतर संत गाडगे महाराज संध्याकाळी कीर्तनांचे आयोजन करायचे आणि आपल्या कीर्तनातून लोकोपयोगी आणि समाजकल्याणाचा संदेश देत. आपल्या कीर्तनात ते लोकांना अंधश्रद्धेच्या भावनांविरुद्ध प्रबोधन करत असत.गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी । असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका. अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशांतून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत.समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू



नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा (प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला.

'देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे - 'या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली' - असे म्हटले जाते. 'महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ', असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत.लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावतीजवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे.दगडात देव नाही तर देव माणसात आहे' जिवंत माणसात, प्राणिमात्रात देव आहे, हे सांगणारे संत गाडगेबाबा होते. भूतदया, प्राणीमात्रांवर दया केली पाहिजे, याकरीता त्यांनी फार मोठे कार्य केले. बोकडबळी प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यासोबतच बैलांवर अत्याचार होतात म्हणून शंकरपट बंद करावे, हे सुद्धा त्यांनी सांगितले होते.

शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे म्हणून शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा याकीता विविध शिक्षण संकुले काढली. शिक्षण संस्थांना मदत केली. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची 'रयत शिक्षण संस्था' यांना मदत करण्यास पासून ते विदर्भातील डॉ. पंजाबराव देशमुख यांची 'शिवाजी शिक्षण संस्था' असो, यांच्या कामाचं सतत कौतुक केले. आपल्या कृतीतून त्यांनी अस्पृश्यतेवर प्रहार केले. अंधश्रद्धा निर्मूलन हे अतिशय महत्त्वाचं काम त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये केलं. जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजला पाहिजे आणि त्या माध्यमातून जनतेने आपलं जीवन व्यतीत केले पाहिजे, यासाठी त्यांनी आयुष्यभर काम केले.

हुंडा प्रथेवर सुद्धा त्यांनी मोठ्या प्रमाणात कठोर टीका केली. हुंडा प्रथा बंद व्हावी, याकरिता प्रयत्न केले. ते माणसांच्या मनांची मशागत करत. स्त्रियांच्या सन्मानासाठी त्यांनी फार मोठ्या प्रमाणात काम केले. किर्तनात आपल्या दशसूत्रीतून त्यांनी 'भुकेल्यांना - अन्न, तहानलेल्यांना - पाणी, उघड्या नागड्यांना - वस्त्र, बेघरांना - निवारा, गरीब मुला-मुलींना - शिक्षण, रोग्यांना - औषध, बेरोजगारांना - रोजगार, मुक्या प्राण्यांना - अभय, दुखी व निराशितांना - हिंमत, तरुण गरीब तरुण-तरुणींचे लग्न लावून दिले. अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नाव दिले आहे.



**डॉ. धनराज चक्रे**
अमरावती




## या ६ गोष्टी भरपूर देतात व्हिटॅमिन बी १२ , तुम्ही चिकन आणि मटण खाणे विसराल...

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

रक्ताचा मुख्य भाग लाल रक्तपेशींनी बनलेला असतो. ते तयार करण्यासाठी व्हिटॅमिन बी १२ आवश्यक आहे. हे तुमच्या नसा मजबूत करून तुमच्या शरीराला चैतन्य देते. जर एखाद्या व्यक्तीमध्ये व्हिटॅमिन बी १२ कमी झाले तर त्याला अनेक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते.



### 'हे' घरगुती उपाय एकदा करून पाहाच..

व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे डोळ्यांपासून पायांपर्यंत सर्वांनाच त्रास होतो. यामुळे श्वास लागणे, डोकेदुखी, अपचन, भूक न लागणे, जलद हृदयाचे ठोके, अंधुक दिसणे, अतिसार, शरीरात मुंग्या येणे, बधीरपणा, मुंग्या येणे आणि अतिसार होऊ शकतो. यावर मात करण्यासाठी ६ खाद्यपदार्थांचे सेवन करावे.

### पौष्टिक यीस्ट

हे शाकाहारी अन्न आहे, जे शाकाहारी व्यक्ती आरामात खाऊ शकते. बाजारात आणण्यापूर्वी त्यात व्हिटॅमिन बी१२ मिसळले जाते. याच्या सेवनाने प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात. याचा उपयोग अनेक पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. फूडडेटा सेंट्रल (संदर्भ) नुसार, यीस्टचे दोन चमचे आवश्यक प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ च्या ७ पट पुरवू शकतात.

**दुग्धजन्य पदार्थ-** प्रत्येकाने दूध, तूप आणि दही खावे, यामध्ये जवळजवळ सर्व आवश्यक पोषण असतात. हे कोबालामिन देखील प्रदान करू शकते आणि हाडे मजबूत करू शकते. दुग्धजन्य पदार्थ मेंदूच्या विकासासाठी आवश्यक आहेत, म्हणून मुलांनी त्यांचे सेवन केले पाहिजे. यामुळे शरीरात जीवन आणि शक्ती येते.

**या दुधात जीवनसत्त्वे मिसळली जातात**

सोयाबीन दुध
बदाम दूध
तांदूळ दूध
अंडी

अंड्यांमध्ये केवळ व्हिटॅमिन बी १२ नाही तर व्हिटॅमिन बी २ मोठ्या प्रमाणात असते. हे संपूर्ण प्रथिनयुक्त अन्न आहे, जे कोबालामीनच्या दैनंदिन गरजेच्या ४६ टक्के पुरवते. संपूर्ण अंड्यामध्ये हे पोषक तत्व असले तरी पिवळ्या भागात त्याचे प्रमाण थोडे जास्त असते.

# चुरणी ग्रामीण रुग्णालयाची घेतली झाडाझडती

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा,-** महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त धीरजकुमार यांनी आरोग्य मंत्र्यांच्या निर्देशानंतर शनिवारी दुपारी चुरणी ग्रामीण रुग्णालयात भेटी दरम्यान विविध समस्यांचा आढावा घेतला. मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू कमी करण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात, या योजनेची माहिती त्यांनी जाणून घेतली. यावर करोडो रुपयांचा निधी खर्च करण्यात येतो, परंतु मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू याला पाहिजे तसा आळा बसला नाही. या संदर्भात सुद्धा त्यांनी जाणून घेतले.

दरवर्षी मेळघाटच्या नावावर नावीन्यपूर्ण योजना राबवित असतांना सुद्धा त्याचा मेळघाटला फायदा होतांना दिसत नाही, त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त धीरजकुमार मेळघाटातील स्थिती जाणून घेण्यासाठी शनिवारी चुरणी ग्रामीण रुग्णालयात आले होते. त्यांनी यावेळी ग्रामीण रुग्णालयाची झाडाझडती घेतली. स्वच्छते बाबत निर्देश देऊन त्यांनी कर्मचार्यांना सूचना दिल्या तसेच ग्रामीण रुग्णालयात ज्या त्रुटी आहेत त्या पूर्ण कराव्यात, असे आदेश दिले. या दौर्यादरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदाळे, अकोलाचे आरोग्य उपसंचालक डॉ. तरंगतुषार वारे, संचालक डॉ. निखिल अंबाडेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेडाऊ, चुरणी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदेव वर्मा आणि कर्मचारी उपस्थित होते. दौर्यादरम्यान आरोग्य विभागाच्या आयुक्तांनी ग्रामीण रुग्णालयात भरती असलेल्या आदिवासी रुग्णांशी संवाद साधला व विचारपूस केली.



# घरकुलाचा लाभ श्रीमंत व्यक्तीला गरीब मात्र रस्त्यावर


विदर्भ प्रजासत्ताक

घरकुलाचा लाभ श्रीमंत व्यक्तीला गरीब मात्र रस्त्यावर

तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच व अधिकारी यांच्या मिली भगत मुळे गरीब परिवार रस्त्यावर

तालुक्यातील गरीब परिवार घर द्या

सुरेश अर्डक हिरजगाव अर्डक

16 Dec 2023 - Page 3 | epaper.vidarbhaprajasattak.com

सुयोग गोरले

## विदर्भ प्रजासत्ताक मध्ये वृत्त प्रकाशित होताच जिल्हा गामीण विकास यंत्रणा एक्टीव्ह मोडवर

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार –** ग्रामीण भागात रमाई योजना, मोदी आवास योजना शबरी आवास योजनेच्या माध्यमातून शासनाकडून गरजू ,गोरगरिबांना घरकुलांसाठी अनुदान देण्यात येते मात्र या मध्ये अनेक ठिकाणी बोगस अधिकारी व ग्रामपंचायत सरपंच यांच्या मिलीभगत मुळे खऱ्या घरकुल लाभार्थी ला घर उपलब्ध होत नाही त्यामुळे गरीब परिवार हा बेघर राहून रस्त्यावर आपला उदरनिर्वाह करत असतो या बोगस कारभार सध्या चांदुर बाजार मध्ये सुरू आहे श्रीमंत व्यक्ती हा श्रीमंत होत आहे गरीब मात्र रस्त्यावर येत आहे ही शोकांतिका सध्या चांदूरबाजार तालुक्यामध्ये सुरू असून यावर अधिकारी गप्प असल्याच वृत्त दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये प्रकाशित होताच जिल्हा गामीण विकास यंत्रणा एक्टीव्ह झाली असून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

योजनेत सुरु असलेल्या भोंगळ करभार ची चौकशी करून योग्य ती कारवाई अधिकारी व सरपंचावर करावी अशी मागणी तालुक्यातील नागरिक व सुरेश अर्डक,वंदना अर्डक, निर्गुण अर्डक यांनी केली आहे तर ग्रामीण भागात शासनातर्फे अनुदानापेक्षा बांधकाम व साहित्य खर्च अधिक असल्याने कर्जबाजारी होत लाभार्थ्यांना घरकुल बांधावे लागत आहे. त्यामुळे गोरगरिबांच्या घराचे स्वप्न कधी पूर्ण होणार, असा प्रश्न चांदूरबाजार तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे.सदर प्रकरणाची बातमी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये प्रकाशीत होताच

जिल्हा गामीण विकास यंत्रणा एक्टीव्ह झाली असून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश गट विकास अधीकारी यांना देण्यात आले आहेत.

# जिवंतपणी शिक्षकांचा फोटो कशाला लावता

## राजेश सावरकर यांचा सवाल: शिक्षक संघटनांचा विरोधच राहणार



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** –राज्य शिक्षण विभागाने वर्गात शिक्षकांचा फोटो लावावा व तो किती शाळांनी लावला याची माहिती मागवली असून वर्गात फोटो लावण्याच्या तुघलकी निर्णयाला सर्व शिक्षकांचा विरोध असल्याचे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले. दरम्यान, जिवंतपणी आमचा कशाला फोटो लावता, असा खडा सवाल यावेळी त्यांनी केला आहे. गेल्या दीड वर्षांपासून शिक्षणमंत्री यांनी वर्गात शिक्षकांचा फोटो लावावा,असा निर्णय घेतला आहे. परंतु त्याचवेळी शिक्षक संघटनांनी विरोध करीत या निर्णयाविरुद्ध आंदोलने केली होती. परंतु पुन्हा शिक्षण विभागाकडे किती फोटो वर्गात लावले गेले, याची माहिती मागविण्यात आली आहे. त्या वेळेपासून कुठेही फोटो लावण्यात आलेले दिसून आले नाही. यापुढील काळात देखील फोटो लावण्यात येणार नसल्याचे सावरकर तसेच शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी सांगितले आहे.

काही ठिकाणी शिक्षकाच्या जागेवर बोगस शिक्षक काम करताना आढळून आल्याने शिक्षण खात्याने हा निर्णय घेतल्याचे कळते. पण शिक्षण विभागात मोठी यंत्रणा असताना असा प्रकार घडणार नसून जिवंतपणीचा शिक्षकांचा फोटो वर्गात लावण्याचा प्रकार हे उचित नाही, अशी प्रतिक्रिया शिक्षकांमध्ये उमटत असून नाराजी व्यक्त होत आहे.शासनाने हा निर्णय त्वरित मागे घ्यावा, अशी शिक्षकांची व संघटनेची भूमिका आहे.अमरावती जिल्हात कुठेही फोटो लागणार नाहीत, असे जिल्हाध्यक्ष गोकुलदास राऊत,संभाजी रेवाळे यांनी जाहीर केला आहे.

# स्कायवॉकचे काम दोन वर्षापासून बंदच



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा,–** चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन असून निसर्गाने चिखलदर्याला भरभरून दिले आहे. चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण असून याबरोबरच चिखलदर्याला लागूनच व्याघ्र प्रकल्प व मोठ्या प्रमाणात जंगल तसेच वनवैभव लाभल्याने महाराष्ट्रासह देशभरातील व जागतिक दर्जाचे पर्यटक सुद्धा चिखलदर्यात येतात. या सर्व गोष्टी लक्षात घेता शासनाने व सिडको कंपनीने या ठिकाणी महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून पर्यटकांसाठी स्कायवॉक उभारण्याचा निर्णय घेतला व त्याचे ८० ते ९० टक्के काम पूर्णही झाले. मात्र मागील दोन वर्षापासून विविध कारणाने या प्रकल्पाचे काम बंद आहे. त्यामुळे आता हा प्रकल्प पूर्ण होणार की नाही, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या भरवशावर अनेकांनी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असून स्थानिकांना सुद्धा या प्रकल्पाचा मोठा फायदा होणार आहे. हा प्रकल्प झाल्यावर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक हजेरी लावणार असून त्या माध्यमातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार आहे. या ठिकाणच्या आदिवासी बांधवांना सुद्धा या प्रकल्पापासून रोजगार मिळणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प व्हावा, अशी जनसामान्यांची भावना आहे. या प्रकल्पाच्या भरवशावर अनेकांनी छोट्या–मोठ्या उद्योगांची या ठिकाणी उभारणी केली आहे; परंतु मागील दोन वर्षापासून स्कॉयवॉकचे काम बंद असल्यामुळे व्यवसायिकांची निराशा होताना दिसत आहे.

# आदिवासी ‘व्हॅलिडीटी’त बोगसगिरी थांबेना, टकारीचे केले टाकणकार

## अमरावतीच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीने बजावली नोटीस

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** राज्यात आदिवासी प्रवर्गाचे आरक्षण मिळण्यासाठी रस्सीखेच सुरु असताना बनावट कागदपत्राच्या आधारे ‘टकारी’चे ‘टाकणकार’ करून ‘व्हॅलिडीटी’ मिळविल्याचा धक्कादायक प्रकार निर्दशनास आला आहे. याप्रकरणी अमरावती येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीने रामेश्र्वर बुधासिंग झाकर्डे यांना नोटीस बजावून मूळ प्रत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील जामगाव येथील रहिवासी विलास पुंडलिकराव गुल्हाणे यांच्या तक्रारीनुसार बुधासिंग बालचंदम झाकर्डे यांचे १४ जुलै २०१२ रोजी मृत्यू झाला आहे. बुधासिंग झाकर्डे यांनी अमरावती येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त केलेले एमआरसी ८१ जामगाव/ ३१९/ २०१०–११ अन्वये ६ सप्टेंबर २०१० रोजीचे


CERTIFICATE OF VALIDITY

CASTE CERTIFICATE SCRUTINY COMMITTEE

‘टाकोणकार’ या अनुसूचित जामतीच्या जात प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करण्यासाठी तकारीसह आवश्यक कागदपत्रे जोडली आहेत. ही कागदपत्रे ‘व्हॅलिडीटी’ समितीने पोलिस दक्षता पथकाकडे चौकशीकरिता पाठविली होती. यात चौकशी अहवाल बुधासिंग झाकर्डे यांच्या प्रकरणात जातीच्या नोंदी सन १९३२, १९३६, १९३९, १९४० आणि १९५८ या ‘टकारी’ प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे बुधासिंग यांचे वारसदार असलेले रामेश्र्वर झाकर्डे यांना चौकशीअंती ‘टकारी’ नोंदी आढळून आल्याने अनावधाने जारी करण्यात आलेले ‘टाकणकार ’जमातीचे वैधता प्रमाणपत्राची मूळ प्रत जमा करावी, असे निर्देश १३ ऑक्टोबर २०२३ रोजी अमरावती येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीच्या उपसंचालकांनी नोटीशीद्वारे दिले आहेत.

> तक्रारीच्या अनुषंगाने रामेश्वर झाकर्डे यांच्या प्रकरणी पोलिस दक्षता पथकाच्या अहवालानुसार ‘टाकणकार’ जमातीचे वैधता प्रमाणपत्र रद्द का करण्यात येवू नये अशी नोटीस बजावली आहे. तसेच हे प्रमाणपत्र कार्यालयात सेवा शाखेकडे जमा करण्याबाबत निर्देश दिले आहे. त्यांनी दिशाभूल व फसवणूक केल्याचे स्पष्ट होते.
>
> **– शिवानंद पेढेकर,** उपसंचालक तथा सदस्य सचिव(प्रभारी) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, अमरावती.

# तीन एकरांतील हरभरा पिकावर शेतकऱ्याने फिरवला नांगर

## हातातोंडाशी आलेले पीक गेल्याने शेतकरी चिंतेत



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी–** अंजनगाव सुर्जी तालुक्यात मागील काही दिवसांत झालेला मॉन्सूनोत्तर पाऊस व ढगाळ वातावरणामुळे रब्बी पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. बुरशीजन्य रोग वाढले. हरभरा पिकात मर रोग वाढल्यामुळे पीक खराबपिकाची शाश्वती दिसत नसल्याने धनेगावातील शेतकऱ्याने तीन एकरांतील हरभऱ्याचे पीक मोडून काढले.अनेक शेतकऱ्यांनी सेवा सहकारी सोसायटीचे कर्ज घेतले घरातील दागिने सावकाराकडे गहाण ठेवून शेतीसाठी पैसे उभे वातावरणाणे हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील जनार्दन हिवसे यांच्या गट नं ५१/३ असलेल्या शेतीमधील हरभऱ्याचे पीक जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यात झालेल्या पावसामुळे खराब झाले आहे.यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन उत्पादन येण्याची शक्यता नसल्याचे पाहून हिवसे

यांनी आपल्या तीन एकर शेतातील पिकावर ट्रॅक्टर फिरवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पेरणीसाठी बियाणे, खत, पेरणी, मशागतीवर मोठा खर्च करत मोठ्या आशेने रब्बी हंगामात हरभरा पिकाची पेरणी केली होती. मात्र पाऊस व किडींनी सर्व हिरावून नेले. शासनाने पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

> रब्बीत तीन एकरांत हरभरा पिकाची पेरणी चार ऑक्टोबर ला केली. मात्र २७ आणि २८ नोव्हेंबरला झालेल्या पावसामुळे शेतातील पीक पूर्ण खराब झाले आहे. पिकाला काही येणार नसल्याचे पाहून त्यावर नाईलाजाने ट्रॅक्टर फिरवावा लागला. नुकसानभरपाई मिळाली तर दुबार पेरणी करून दुसरे पीक घेता येईल.**– विलास हिवसे शेतकरी,धनेगाव–**

# स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कारासाठी प्रवेशिका आमंत्रित

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** अमरावतीच्या स्वः सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दरवर्षी स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय मराठी वाङ्मय पुरस्कार देण्यात येतात. २०२३ साठी सुद्धा खालील वाङ्मय प्रकारांसाठी प्रवेशिका मागविण्यात येत आहेत.

उत्कृष्ट कादंबरी, कथासंग्रह, कवितासंग्रह, वैचारिकव समीक्षा लेखन, बालसाहित्य, संमिश्र वाङ्.मय असे एकूण सहा पुरस्कार देण्यात येतील. प्रत्येकी ५०००/ रू. रोख, शॉल, श्रीफळ गौरवचिन्ह, सन्मानपत्र, असे सदर पुरस्काराचे स्वरूप आहे. १/१/२०२३ ते ३१/१२/ २०२३ या कालावधीत प्रकाशीत कलाकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरण्यात येतील.

संबंधितांनी पुस्तकाच्या दोन प्रती, अल्प परिचय, ३१ डिसेंबर २०२३ पर्यन्त आर. एस. तायडे, १२, 'दिक्षा', कोणार्क कॉलनी, रंगोली लॉन मागे, कठोरा रोड, अमरावती, ४४४६०४ या पत्यावर पोस्टेजसह पाठवावे, असे आवाहन स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष रामचंद्रजी पोटे, संयोजक प्राचार्य डॉ. शोभा रोकडे, समिती सदस्य प्रा.डॉ कुमार बोबडे, प्रा. डॉ. पंकज वानखडे, प्रा.डॉ मंदा नांदूरकर, ॲड. प्राजक्ता राऊत, विनोद तिरमारे, संदिप देशमुख, विशाल मोहोड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२०१२५७६१ (आर. एस. तायडे) या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

# विद्यार्थ्यांच्या बेमुदत चिता आमरण उपोषणाला नितीन कदम यांचा पाठिंबा

## सुरक्षा रक्षक भरती निकालाचा प्रश्न पेटला



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** अमरावती शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १६ डिसेंबर २०२३ पासून विदर्भातील विविध जिल्ह्यामधील विद्यार्थी आपल्या सुरक्षा रक्षक भरती निकालाबाबत बेमुदत चिता आमरण उपोषण पुकारले आहे. दरम्यान उपोषणस्थळी एकही लोकप्रतिनिधी अद्यापपर्यंत पोहोचले नाही. ही खुप लाजिरवाणी बाब आहे. अश्यातच नितीन कदम यांनी आपल्या सामाजिक दायित्वचा परिचय देतं उपोषणस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. तसेच विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेत सदर आंदोलनाला सोबत मिळून शासकीय दालनात सादर करण्याची ग्वाही यावेळी नितीन कदम यांनी दिली.

यावेळी स्वप्निल मालधूरे,अभिषेक सवाई , विवेक टपके, मयूर आगरकर, विनोद गव्हाणे, दिगंबर सरकटे , दयानंद नखरे, नफिसोद्दिन, प्रफुल्ल कथोळे, अक्षय बहुलकर, प्रवीण इंगळे, निलेश कोठे, अमोल महल्ले, सचिन सुर्वे, आकाश लोखंडे, प्रदीप जाधव, प्रकाश आडे, गजानन राठोड, श्रवण जाधव, गोपाल कोलटेके, मंगेश ठाकरे, अनंत भताने, वैभव बागडे, अक्षय काबनपुरे, अभिलाष दाभाडे, रामभाऊ डोंगरे, अमिताभ मिश्रा,अभिषेक बावस्कर, अमर लोखंडे, प्रवीण इंगळे, दिगंबर सरकटे, राहुल मनवरे, राजरत्न मानकर, सय्यद इरफान सय्यद गफ्फार, मो. साबीर शेख शब्बीर, मोहसीन नवाब आदि उपस्थित होते.

> या ५०० विद्यार्थ्यांच्या सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया संदर्भातील निकाल अजून का जाहीर झाला नाही. यामध्ये विविध प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. अद्याप या विद्यार्थ्यांचा निकाल आला नसून ते न्यायाच्या प्रतीक्षेत आज इथे उपोषण करायला बसले आहेत. आपल्या लोकशाहीप्रदान प्रशासन व्यवस्थेत आता विदयार्थ्यांना उपोषण करायला बसावे लागत आहे, यापेक्षा मोठी शोकांतिका नाही होऊ शकत. यावर लवकरात लवकर सुरक्षा रक्षक मंडळाचा हा भोंगळ कारभार समोर आला पाहिजे. अन्यथा आम्ही आमच्या पद्धतीने आंदोलनं उभारून तोडगा काढणार.
>
> **–नितीन कदम : सामाजिक कार्यकर्ता**

# नवीन वर्षात धूमधडाक्यात उडवून टाका लग्नाचा बार; असे आहेत मुहूर्त

## विवाह हटके पद्धतीने करण्यासाठी लॉन्स, हॉटेल बुक

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

वर्ष २०२३ संपायला अवघे पंधरा दिवस शिल्लक असून, २०२३ या वर्षात अधिक मासामुळे अनेक जोडप्यांचा विवाह सोहळा लांबणीवर पडला होता. मार्च, एप्रिल महिन्यात विवाह मुहूर्त एकही नसल्याने अनेक इच्छुक जोडप्यांना विवाह करता आला नाही. आता मात्र नवीन वर्षात इच्छुक जोडप्यांना धूमधडाक्यात कार्य उरकता येणार आहे.

२०२३ मध्ये जानेवारी, फेब्रुवारीनंतर विवाहासाठी थेट मे महिन्यात मुहूर्त होते. मात्र, मे महिन्यातील उकाडा आणि




आधीच फुल झालेले हॉल पाहता अनेक जोडप्यांनी आपले लग्न पुढे ढकलले. जूनमध्ये मुहूर्त असले तरी विवाहासाठी इच्छुक असलेल्या जोडप्यांनी पावसाळ्यानंतर विवाह करण्याचा निर्णय घेतला. त्यातच अधिक मास आला. इतकेच काय तर पितृपक्षामुळेदेखील अनेक विवाह रखडले होते. आता नवीन वर्षात जोडप्यांना विवाह करता येणार आहे.अमरावती शहरातील नावलौकिक असलेल्या हॉटेल रंगोली पर्ल ला सध्या विवाह समारंभासाठीअधिक पसंती अमरावतीकरांची मिळत आहे.

### हे आहेत २०२४ मधील विवाह मुहूर्त

जानेवारी : २, ३, ४, ५, ६, ८, १७, २२, २७
फेब्रुवारी : १, २, ४, ६, १२, १३, १७, १८, २४, २६, २७, २८, २९
मार्च : ३, ४, ६, १६, १७, २६, २७, ३०
एप्रिल : १, ३, ५, १८, २०, २१, २२, २६, २८
मे : १, २
जून : २९, ३०
जुलै : ९, ११, १२, १३, १४, १५, १९, २१, २२, २३, २५, २६, २७, २८, ३०, ३१
ऑगस्ट : १०, १३, १४, १६, १८, १९, २३, २७, २८
सप्टेंबर : ५, ६, १४, १५, १६
ऑक्टोबर : ७, ९, ११, १२, १३, १६, १७, १८, २१, २६
नोव्हेंबर : १७, २२, २३, २५, २६, २७
डिसेंबर : ३, ४, ५, ६, ७, ११, १२,१४,१५,२०,२३,२४, २६

# अजूनही कापसाच्या दरात तेजी नाहीच; शेतकरी चिंताग्रस्त

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडे.**

यंदा कापसाच्या उत्पादनात घट आलेली आहे. दर वाढतील, या अपेक्षेने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

निर्माण झाले होते. मात्र अवकाळी पाऊसानंतर कापसाच्या दरात मोठी घसरण झाली, दर सहा हजार नऊशे रुपयांवर आले आहेत. यंदासुरुवातीपासून कापसाला चांगले दर मिळतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशाच पडली आहे. गेल्या वर्षी कापसाला चांगले दर मिळालेहोते. अखेरच्या टप्प्यात दरवाढ झाल्याने शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच त्याचा फायदा झाला.यंदा हंगामाच्या सुरुवातीपासून कापसाला चांगले दर मिळण्याचा



अंदाज तज्ज्ञांचा होता.

तो खरा होताना दिसत असतानाच अवकाळी वादळी पावसाने शेतकऱ्यांचा घात केला. हंगामाच्या सुरुवातीपासूनच कापसाला हमीभावापेक्षा जास्त दर मिळत होता.कापसाचे पीक चांगले दिसतानाही उत्पादन कमी आल्याने शेतकरी मेटाकुटीस आले. कपाशीला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. पिकांची वाढ खुंटल्याने त्याचा परिणाम उत्पादनावर झाला आहे. राहिलेली कसर वादळी पावसाने भरून काढली. त्यामुळे उत्पादनात मोठी घसरण झाली. गेल्या वर्षी शेवटच्या टप्प्यात कापसाला १२ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला होता.यंदा खासगी बाजाराचा प्रारंभ झाला, तेव्हा दहा हजार रुपये दर देण्यात आला. त्यामुळे या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता होती. मात्र, दरवाढीची शक्यता आता धूसर झाली आहे. कापसाच्या दरात घसरण झाली असून, दर सहा हजार नऊशे रुपयांवर स्थिरावले आहेत. एका मागून एक संकट येत असल्याने यंदाचा हंगामही शेतकऱ्यांच्या हातून गेल्यातच जमा आहे.

कापसाच्या उत्पादनात घट झाली आहे. मागणी वाढल्याने कापसाचे भाव वाढतील, अशी अपेक्षा होती. अतिवृष्टीनंतर वादळी पावसाने अडचण झाली. उत्पादन घटले असून, – सध्या कापसाचे दर सात हजार रुपयांच्या आत आले आहेत. हा भाव पाहता लावगड खर्चही निघणे कठीण झाले आहे. ढगाळ वातावरणाने रब्बी हंगामातील हरभरा पिकावर कीड व रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे.

# सुरक्षा रक्षक मंडळाकडून आयोजित भरती प्रक्रिया रद्द

**दि. १८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

: उद्योग, उर्जा व कामगार विभागांतर्गत सुरक्षा रक्षक मंडळाने समुच्चय पुल तयार करण्यासाठी शासन नियमाप्रमाणे तसेच योजनेतील तरतूदीनुसार भरती प्रक्रिया राबवून उमेदवाराचा निकाल तथा प्रतिक्षायादी जाहीर करण्यासाठी मंडळाने शासनास प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास प्रशासनाने मंडळाद्वारे कायदेशिर बाबीची पूर्तता न केल्याने ही भरती प्रक्रिया रद्द करुन नव्याने भरती प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ तथा सहायक कामगार आयुक्त अध्यक्ष यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक नोकरीचे नियमन व कल्याण अधिनियम १९८१ अन्वये अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, योजना दि. २१ फेब्रुवारी २०१२ नुसार हे मंडळ स्थापीत असून मंडळामार्फत सरकारी, निमसरकारी, मंडळे, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, कारखाने व खाजगी आस्थापना येथे नोंदीत सुरक्षा रक्षकांचा नियमानुसार व आस्थापनेच्या मागणीनुसार पुरवठा करण्यात येते. मंडळाचे कार्यक्षेत्र पाच जिल्ह्याचे असून अमरावती येथील मुख्य कार्यालयातून पाचही जिल्ह्याचे कामकाज करण्यात येते.

# तरुणांचे सीटी स्कॅन, ईसीजी, एक्स-रे मोफत; आरोग्य तपासणी केली का?

## उद्दिष्ट्यपूर्तीकडे वाटचाल : निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

१८ वर्षांवरील तरुणांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यासाठी राज्य शासनाच्या आरोग्य विभागातर्फे 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील दीड लाख तरुणांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली तर हजारो जणांच्या विविध चाचण्या करण्यात आल्या आहेत. अभियानाची उद्दिष्ट्यपूर्तीकडे वाटचाल सुरू आहे.आयुष्मान भव योजनेंतर्गत १८ वर्षावरील



पुरुषांची सर्वांगीण आरोग्य तपासणी केली जावी, यासाठी 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्टाचे' अभियान राबविण्यात आले. हे अभियान आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असून, तरुणांच्या आरोग्य तपासण्या होत आहेत.

**१८ वर्षांवरील तरुणांच्या मोफत तपासण्या**

निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे या अभियानाच्या माध्यमातून जिल्हा सामान्य रुग्णालयात जिल्ह्यातील अठरा वर्षांवरील सर्व तरुणांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे. जवळपास लाख तरुणांची मोफत तपासणी करण्यात आली.

**या तपासण्या होतात मोफत**

जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपकेंद्र आदींमध्ये निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' या योजनेंतर्गत पुरुषांची ईसीजी, सीटी स्कॅन, एक्स-रे आदी मोफत तपासणी केली जाते.

**कोठे कराल मोफत तपासणी?**


जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपकेंद्र आदींसह हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आदींमध्ये या योजनेंतर्गत तरुणांची मोफत तपासणी करून उपचार केला जातो. या योजनेमुळे दिलासा मिळाला आहे.

# वादाने टोक गाठलं, आता थेट शिंदे-फडणवीस मध्यस्थी करणार?; गिरीश महाजनांचं मोठं वक्तव्य

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

मराठा आरक्षण प्रश्नावरून मनोज जरांगे पाटील विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यातील वादाने टोक गाठलं आहे. भुजबळ आणि जरांगे पाटील या दोघांकडूनही एकमेकांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका केली जात असल्याचं पाहायला मिळत आहे. या दोन नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोपांमुळे दोन समाजांमध्ये तणाव निर्माण होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. याबाबत प्रश्न विचारण्यात आल्यानंतर भाजप नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना महत्त्वपूर्ण वक्तव्य केलं आहे. याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील यांना संयमी भूमिका घेण्यासाठी विनंती करणार असल्याचं महाजन यांनी म्हटलं आहे.

भुजबळ आणि जरांगे पाटलांमधील वादावर बोलताना गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे की, राज्यातील वातावरण दूषित होता कामा नये. मी दोघांना देखील सांगितलं आहे की, संयम ठेवा. याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देखील



दोघांना विनंती करणार आहेत, अशी माहिती महाजन यांनी दिली. तसंच मराठा समाजाला न्याय मिळायला हवा, असंही ते म्हणाले. मराठा आरक्षणाबद्दल बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, चुकीचं काम होणार नाही, सगळ्या नोंदी जुन्या आहेत. कुणबी नोंदी असलेल्या लोकांना दाखले मिळाले पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. परंतु आम्हाला जे आरक्षण द्यायचं आहे ते टिकणारं द्यायचं आहे. आपल्याला सरसकट आरक्षण कुणबी म्हणून देता येणार नाही. मात्र मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार सकारात्मक आहे, अशा शब्दांत महाजन यांनी सरकारची भूमिका मांडली आहे.

# सावकार कर्जदाराकडून किती टक्के व्याज घेऊ शकतो?

## मनमानी करणाऱ्यांवरकरा तक्रार : सावकारावर होते कारवाई

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आर्थिक अडचण आल्यास सावकाराकडून कर्ज घेतले जाते. हे कर्ज देताना तारण असल्यास १२ टक्के दराने तर विनातारण १५ टक्के दराने सावकाराकडून कर्ज दिले जाते. मात्र, काही सावकार नियमांची पायमल्ली करत दामदुप्पट दराने कर्ज देतात. त्यामुळे एवढ्या भरमसाठ व्याजदराने दिलेल्या कर्जामुळे कर्जदार मेटाकुटीला येतो. मात्र, नियमांच्या अधीन राहून कर्ज न देणाऱ्या सावकारांविरोधात तक्रार करता येते व कारवाईही केली जाते.एखादी व्यक्ती अवैध सावकारी करत असेल किंवा कर्जदाराकडे तगादा लावत असेल तर अशा सावकाराविरुद्ध जिल्हा उपनि- बंधक कार्यालयाकडे तक्रार करता येते. अशा सावकारावर कारवाई होते.

**तारणावर १२ तर बगरतारणावर १५ टक्के**

तारण ठेवून कर्ज घेणाऱ्याला सावकार १२ टक्के व्याजाने कर्ज



देऊ शकतो तर बिगर तारण कर्ज देताना ते १५ टक्के व्याजाने देऊ शकतो.

काही सावकार २१ ते २८ टक्के व्याजाने कर्ज देत आहेत. त्यामुळे ते कर्ज फेडताना कर्जदार मेटाकुटीला येतो.

**व्याजदर जास्त घेत असल्यास परवाना निलंबित**

एखादा सावकार व्याजदर जास्त घेत असल्याची तक्रार जिल्हा उपनिबंधकांकडे केल्यास अशा सावकारांवर कारवाई करून त्यांचा परवाना निलंबित केला जातो.

**पाच वर्षे होते कारावासाची शिक्षा**

सावकारी करण्यासाठी अधिकृत परवाना लागतो. त्याचप्रमाणे शासनाने घालून दिलेल्या अटी आणि शर्तींचे पालन त्यांना करावे लागते. सावकारां- कडून कर्ज घेतल्यास आणि ते वेळेवर फेडले गेले नाही तर घर किवा असलेल्या जमिनीवर अतिरे- कीपणाने अतिक्रमण करत जप्तीची कारवाई केली जाते. सावकारांना ठरवून दिलेल्या व्याजदरापेक्षा जास्त दराने व्याज आकारणाऱ्या सावकारांवर कायद्याने कारवाई होते. प्रसंगी अशा सावकाराला पाच वर्षे कारावासाची शिक्षा होते.

# तीन दिवस ग्रामसेवकांचे काम बंद आंदोलन

## १८ ते २० डिसेंबर पर्यंत चालणार आंदोलन



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार**

आज पासून तीन दिवस ग्रामसेवकांचे काम बंद आंदोलन असल्याचे निवेदन महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन ने आज गटविकास अधिकाऱ्यांना दिले. गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात विविध प्रलंबित न्याय मागण्यासाठी ग्रामसेवक युनियनने, सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे तीन दिवस काम बंद आंदोलन पुकारले आहे. ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे दोन्ही पद एकत्र करून पंचायत विकास अधिकाऱ्यांचे पद निर्माण करणे, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त काम कमी करणे, स्थापन झालेल्या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करणे, ग्रामसेवक पदाचे सेवा प्रवेश नियमात सुधारणा करणे, शैक्षणिक अहर्ता कोणत्याही शाखेची पदवी करणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४९ चे नियमात सर्व जिल्हा परिषदेचा अहवालानुसार सुधारणा करणे, विस्तार अधिकारी पदाची संख्या वाढविणे, प्रशासन दिरंगाई मुळे १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त दिलेल्या मात्र एक नोव्हेंबर २००५ पूर्वी भरती प्रक्रिया चालू झालेल्या ग्रामसेवक यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करणे, कंत्राटी पद्धतीने ग्रामसेवक भरती बंद करणे, शिक्षकाप्रमाणे ग्रामसेवकांचे प्रश्न विधान परिषद मध्ये मांडण्यासाठी प्रतिनिधित्व मिळणे आदी मागण्यांचा निवेदनामध्ये समावेश करण्यात आला आहे.

निवेदन घेताना गटविकास अधिकारी मोहन शुगारे व सहाय्यक गटविकास अधिकारी नारायणराव अमझरे यांना संघटनेने निवेदन दिले या वेळी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश रेखाते, कोषाध्यक्ष निलेश घुरडे, प्रसिद्धी प्रमुख संदीप गोहोत्रे, रोहित बंड यांच्यासह युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या सरकारला निवडणुका घ्यायला वेळ नाही; ॲड. यशोमती ठाकूर यांचा विधानसभेत सरकारवर हल्लाबोल

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यामध्ये अनेक प्रश्न प्रलंबित आहे, नदीवर साकव नसल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. सरकार त्याकडे लक्ष देत नाही आणि जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधी आवश्यक असताना निवडणुकाही घेत नाही, जनतेच्या प्रश्नासाठी या सरकारकडे कुठलेच धोरण नाही अशा शब्दात काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी आज विधानसभेत सरकारवर हल्ला चढवला. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान त्या बोलत होत्या. विधानसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासात दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातील सावडाव – नेरले आणि मिळदे- हातगे या गावादरम्यान. साखर आवश्यक असून जिल्हा नियोजन समिती मधून हे साकव पूर्ण करावेत अशी मागणी, आमदार राजन साळवी यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दरम्यान केली. यावर उत्तर देताना रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी एका साकवासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा खर्च येतो. वास्तविक



जिल्हा नियोजन समिती मधून एका साठवासाठी एवढी रक्कम खर्च करता येत नाही. जास्तीत जास्त ५० लाख रुपयांचा निधी एका साकवासाठी दिला जातो. त्यामुळे हे साकव बांधण्यासाठी वेगळ्या हेड खाली तरतूद करावी लागणार आहे, एकूणच राज्यातील साकवांसाठी तेराशे कोटी रुपये लागणार आहेत त्याबाबत सरकार विचार करीत असल्याचे उत्तर दिले. मंत्री चव्हाण यांच्या या उत्तराने समाधान न झालेल्या काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. सरकारला जनतेच्या प्रश्नांमध्ये कुठलेही स्वारस्य दिसत नाही. रत्नागिरी जिल्ह्यातल्या या दोन साकवांच्या अभावी जनता जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहे. परिणामी साकव नसल्याने जनतेला प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असून त्यांना अतिशय दूरवरून प्रवास करावा लागत आहे. मात्र, हे सरकार निष्क्रिय असून सरकारने राज्यातील साकवाबाबत निश्चित धोरण ठरवले पाहिजे. सरकारला जिल्हा परिषदेच्या निवडणुका घ्यायच्या नाही, लोकप्रतिनिधींनी कारभार करावा असे सरकारला वाटत नाही आणि दुसरीकडे सरकार स्वतःही निष्क्रिय आहे कुठलेही धोरण ठरवत नाही ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची घनाघाती ठिकाणी ड. ठाकूर यांनी यावेळी केली.

# एक बार ... आ .. जा आ.. जा... .. भोले कि शरण में ......

## श्री शिव पार्वती शिवमहापुराण कथा पूज्य पंडित प्रदीप जी मिश्रा (सीहोर वाले) 'श्री शिवाय नमोस्तुभ्यं' मंत्राने कथास्थळी चैतन्य









**हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्टतर्फे हनुमानगढी येथे आयोजित पाच दिवसीय शिवमहापुराण कथेला सुरुवात झाली आहे. कथेचा आजचा तिसरा दिवस होता. महाराष्ट्र राज्यासह सह इतर राज्यातील लाखो भाविक शिवकथेचा आनंद घेत आहे. रोज प्रमाणे आजही राणा दाम्पत्याने या कथेचा लाभ घेतला आयोजकांच्या वतीने अतिशय उत्कृष्ट व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. तर पोलिसांचा तगड़ा बंदोबस्त या ठिकाणी आहे.**

## लोकसभा निवडणुकीचे वारे, राजकीय नेत्यांची जिल्ह्यात वाढली रेलचेलमेळावे, भूमिपूजन, सामाजिक कार्यक्रमांवर भर

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. त्यादृष्टीने तयारीही सुरू झाली आहे. जिल्ह्यात युवा स्वाभिमान,भाजप, काँग्रेससह अन्य राजकीय पक्षांनी लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रम, मेळावे, भूमिपूजनाचे कार्यक्रम आटोपण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे.



मागील दीड वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी बाशिंग बांधून बसलेल्या इच्छुकांच्या मदतीने मतदारांपर्यंत पोहोचण्याचे काम राजकीय पक्षांनी सुरू केले आहे. सत्ताधाऱ्यांद्वारे शासनाच्या विविध योजनांची माहितीही नागरिकांपर्यंत पोहोचविली जात आहे. राजकीय नेत्यांचे दौरेही सध्या वाढले आहे. मागील काही दिवसांपासून लोकसभा निवडणुकीची चर्चा सुरू झाली आहे येत्या काही महिन्यांमध्ये सार्वत्रिक - निवडणूक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सध्या जिल्ह्यात रेचलेच वाढली आहे. गावागावांत नेत्यांचे दौरे सुरू झाले - असून विकासकामांचा धडाका सुरु आहे. लोकसभा निवडणुकीची तयारीसुरू झाल्याचे मतदारांनाही स्पष्टपणे जाणवू लागले आहे. लोकसभेसाठी गावपातळीवरील कार्यकत्यांना घेऊनच कामे करावी लागणार असल्याने त्यांच्या बळावरच गावागावांत विकास कामांचे उद्घाटन केले जात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सध्यातरी होणार नसल्याचे जवळजवळस्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता प्रथम लोकसभेसाठी, त्यानंतरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काम करायचे असे कार्यकत्यांनीही ठरवून टाकले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडणूक लढविण्याची आपली इच्छा बाजूला ठेवून कार्यकर्ते पुन्हा कामाला लागले आहेत.

**प्रशासक राज आणखी किती दिवस**

जिल्हा परिषद, महापालिका, नगरपरिषदांमध्ये मागील दीड वर्षापासून प्रशासन राज आहे. लोकप्रतिनिधीशिवायच कारभार रेटला जात आहे. अनेक प्रभागांमध्ये कामे रखडली आहेत. १२ नागरिक प्रशासनाकडे कामासंदर्भात निवेदन घेऊन जात आहे. मात्र प्रत्येकवेळा नागरिक प्रशासनापर्यंत पोहोचू शकत नसल्याने आपल्या हक्काचा वार्डातील मानून त्यांना हवा आहे. त्यामुळे आणखी किती दिवस प्रशासक राज चालेल, याबाबतही नागरिकांमध्ये संभ्रम आहे. लोकसभेपूर्वी जिल्हा परिषद, महापालिका निवडणुका घ्याच्या, अशी सामान्य नागरिकांची मागणी आहे.

## हुडहुडी वाढली, उबदार कपड्यांच्या मागणीत वाढ

## किमतीही १० ते १५ टक्क्यांनी वाढल्या

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्ह्यात गेल्या पंधरवड्यात सर्वत्र पाऊस कोसळला. त्यानंतर थंडीची चाहूल लागली. शहराच्या किमान तापमानात सातत्याने घसरण होत आहे. त्यामुळे गेल्या चार-पाच दिवसांपासून अमरावती जिल्ह्यात थंडी वाढली आहे. सर्वत्र हुडहुडी जाणवू लागली आहे.



या कडाक्यापासून संरक्षण करण्यासाठी अमरावतीकर नागरिक आता उबदार कपड्यांच्या खरेदीकडे वळले असून या कपड्यांना मागणी वाढली आहे. सकाळी व सायंकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडताना नागरिक उबदार कपडे, कान टोपी घालून दिसू लागले आहेत. यंदा उबदार कपड्यांच्या किमती १०ते १५ टक्क्यांनी वधारल्या आहेत. नोव्हेंबर महिन्यात अवकाळी पावसाने जिल्ह्याला झोडपले, त्यानंतर तापमानात घट होत थंडीचा जोर हळूहळू वाढला. पाच दिवसांपासून थंडीचा जोर आणखीच वाढल्याने नागरिकांकडून स्वेटर व मफलरचा वापर वाढला आहे. ग्राहकांची मागणी लक्षात घेता विक्रेत्यांनी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांना आवडतील असे कपडे विक्रीसाठी आणले आहेत. यामध्ये विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वेटर, मफलर, कानटोपी, कानपट्टी यांचा समावेश आहे. तरुण वर्गाला आकर्षित करण्यासाठी स्वेट शर्ट्स, विंटर कोट, कॉटन जॅकेट्स, हुडीज अमरावती बाजारात आल्या आहेत.

**पारा १८ ते २० अंशावर**

जिल्ह्यात थंडी वाढत वाढत असून मागील काही दिवसांमध्ये तापमानामध्ये घट झाली आहे. दोन दिवसापासून तापमान १८ ते २० अंश आहे. थंडीचा फायदा घेत सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या व व्यायाम करणाऱ्या नागरिकांची वर्दळ वाढली आहे.तर चिखलदर्यात पारा १२ अंशावर पोहचला आहे.

## एनआयएची अचलपुरात छापेमारी, युवकाची चौकशी; कारवाईबाबत कमालीची गुप्तता

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर**

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अचलपूर येथे एका घरावर छापा घालून एका युवकाची चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे. 'एनआयए'च्या पथकाने सोमवारी पहाटे ही कारवाई केली. यावेळी स्थानिक पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या कारवाईमुळे अचलपुरात खळबळ उडाली आहे. 'एनआयए'चे पथक रात्री २ वाजताच्या सुमारास अचलपूर येथील अकबरी चौक परिसरात पोहचले. त्यांनी एका घरात पोहचून युवकाची चौकशी सुरू केली. या युवकाच्या हालचालींवर राष्ट्रीय तपास संस्था लक्ष ठेवून होती.




सकाळी ६ वाजेपर्यंत ही चौकशी चालली. संबंधित युवक नागपूर येथे शिक्षण घेत असल्याची माहिती मिळाली आहे. नागपूर आणि मुंबई येथून तीन वाहनांमधून 'एनआयए'चे पथक अचलपूर येथे पोहचले. अचलपूर आणि सरमरसपूरा पोलिसांचे संरक्षण घेऊन त्यांनी अकबरी चौक परिसरातील एका घरावर छापा घातला. यावेळी पोलिसांच्या सुमारे १५ वाहनांचा ताफा पोहचला होता. छापेमारीबाबत मात्र 'एनआयए'ने अद्याप तपशील दिलेला नाही. स्थानिक पोलिसांनीही याबाबत गुप्तता पाळली आहे. 'एनआयए'सारखी राष्ट्रीय पातळीवरील तपास यंत्रणा कारवाई करीत असताना स्थानिक यंत्रणेला फारशी कल्पना देत नसल्याचे आजवर दिसून आले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब महत्वाची असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

## वर्ध्याची स्ट्रॉबेरी मुख्यमंत्र्यांना भावली म्हणाले, माझ्या स्ट्रॉबेरीपेक्षा उत्तम

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक वर्धा**

समुद्रपुर तालुक्यातील पाथरी येथील पाटील कुटुंब पूर्णतः शेतीत रमणारे. नव्या पिढीनेही हा वारसा आता चालविला आहे. घरात आलेली सून स्वतः शेतीत वेळ देणारी आणि म्हणून तिलाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट घालून देण्यात आली. त्यावेळी स्ट्रॉबेरीची चव मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतली. मी पण माझ्या सातारा येथील शेतीत स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेतो. पण त्यापेक्षा ही फळे अधिक चवदार व आकर्षक रंगाची आहेत, अशी पावती मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे भारती महेश पाटील यांनी सांगितले.



पती महेश पाटील यांच्यासह त्यांची ही भेट जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घालून दिली होती. गावात गेल्या दोन वर्षांपासून पाटील कुटुंब स्ट्रॉबेरी पिकवत आहे. उष्ण कटिबंधात असलेल्या शेतीत हे थंड हवामानातील पीक घेण्यावेळी अनेकांनी त्यांना असे धाडस न करण्याचा सल्ला दिला होता. पण आज ते तर उत्पादन घेतातच पण अन्य शेतकऱ्यांनाही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. एकूण अकरा एकर परिसरात लागवड होत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आमच्या स्ट्रॉबेरीची चव चाखली, असे त्या नमूद करतात. पाच एकरात किमान ६० ते ७० लाख रुपयाचे उत्पन्न होणार असल्याचे पाटील सांगतात. जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले की, मी स्वतः ही शेती पाहिली. हे पीक अधिकाधिक शेतकऱ्यांनी घ्यावे म्हणून कृषी विभागातर्फे प्रयत्न सुरू आहे. भविष्यात हे क्षेत्र निश्चितच वाढेल.

## संत्रा उत्पादकांसाठी सरकारने ठोस धोरण राबवावे : ॲड .यशोमती ठाकूर

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विदर्भातील शेतकरी दरवर्षी सुमारे १२ ते १५ लाख संत्र्याची निर्मिती करत असतात मात्र या संत्र्याला निर्यात धोरण राबवण्यात सरकार अयशस्वी ठरले आहे. निर्यातीसाठी असलेल्या विशिष्ट प्रोटोकॉल मध्ये केंद्र सरकारने संत्र्याची नोंद केली नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्या देशात संत्रा पाठवायचा याची माहिती मिळाली नाही. परिणामी राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन परदेशात पाठवता येत नाही. राज्यात पाच खाजगी संत्रा निर्यात केंद्र आहेत मात्र एकही सरकारी निर्यात केंद्र नाही याचा फटका शेतकऱ्यांना बसत असल्याचा आरोप काँग्रेसच्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी आज विधानसभेत केला. राज्यातील संत्रा उत्पादक शेतकरी हे मोठ्या प्रमाणात विदर्भातील असून विदर्भात दरवर्षी १२ ते



१४ लाख संत्रा उत्पादन होते मात्र यापैकी अत्यंत कमी प्रमाणात संत्र्याची निर्यात प्रदेशात केली जाते केवळ बांगलादेशातच संत्र्याची निर्यात केली जात असून अन्य देशांमध्ये संत्र्याची मागणी आहे का? किंवा कोणत्या पद्धतीचा संत्रा अन्य देशांमध्ये खाल्ला जातो, याबाबतची कोणतीही माहिती संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नाही. ही माहिती प्राप्त होण्यासाठी संत्रा उत्पादक शेतकरी यांना अपेडा किंवा केंद्र सरकारच्या आयसीसीआर यांच्या माध्यमातून माहिती दिली जाते. विशिष्ट प्रोटोकॉल नोंद करताना संत्रा या पिकाची नोंद केली गेली नसल्याने ही माहिती या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसल्याचे ठाकूर यांनी सभागृहात सांगितले.९ ऑक्टोबर २०२१ रोजी अपेडा आणि आयसीसीआर या संस्थांमध्ये संत्रा निर्याती बाबत सामंजस्य करार झाला. मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही . परिणामी शेतकऱ्यांपर्यंत त्याची माहिती पोहोचली नसल्याचे ठाकूर यांनी सांगितले. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना ही माहिती मिळण्यासाठी तसेच त्यांच्यापर्यंत माहिती जाण्यासाठी आणि शेतकऱ्यांना निर्यातक्षम संत्रा उत्पादन करण्यासाठी सरकारने निर्यात केंद्र उभारावे, अशी मागणी ड. ठाकूर यांनी सभागृहात केली.

## गुजरातचा विकास झाला तर देशाचा विकास होईल, पंतप्रधानांच्या वक्तव्याचा ठाकरेंकडून समाचार; म्हणाले तुम्ही कधीतरी....

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

सूरत डायमंड बोर्सचे काल (१७ डिसेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. सूरतचा विकास झाला तर गुजरातचा विकास होईल आणि गुजरातचा विकास झाला तर देशाचा विकास होईल, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्याचे पडसाद आता देशभरातून उमटू लागले आहेत. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही मोदींच्या या वक्तव्याचा समाचार घेतला. मुंबईतील हिरे बाजार सूरतला नेल्याचं दुख नाही, पण खेद आहे. मुंबईत जो व्यवसाय सुरू होता, तो उठवून सूरतला घेऊन जात आहात. काल पंतप्रधान म्हणाले की गुजरात मजबूत झाला तर देश मजबूत होईल, म्हणजे देश काय एवढा कमकवूत आहे का? पंतप्रधांना आठवण करून देतो की ते देशाचे पंतप्रधान आहेत. तुम्ही कधीतरी गुजरातचे मुख्यमंत्री होतात, तेव्हा असं बोलला असतात तर ठिक होतं. परंतु, देशाचे पंतप्रधानांच्या तोंडी अशी भाषा शोभून दिसत नाही, असं ठाकरे म्हणाले.